संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
29 MAY 2026
प्राप्त झाले सही........................

**सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करणेबाबत.**
**श्री. नितीन प्र. दांडगे व इतर ५ लेखा अधिकारी.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.८१/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २५ मे, २०२६.

<u>संदर्भ</u>:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/स.प्र.का./अमरावती/२.२०२६/२१७/१८३/८७८, दि.११.०२.२०२६,
२) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र जा. क्र. नादेकृसंप्र-०४२४/प्र.क्र.३९/मृवि/११०६, दि.३१.१२.२०२४,
३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे आदेश क्र.सहसंलेवको/अम/आस्था-२/म.वि.ले.से. एकतर्फी कार्यमुक्त/२१/२०२४/२८, दि.०२.०१.२०२५,
५) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.२००/कोषा प्रशा-२, दि.१५.०१.२०२५,
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती आदेश क्र.सहसंलेवको/अम./प्रशा-४/कार्यमुक्त/लेखा अधिकारी/ २९/२०२५, दि.१६.०१.२०२५
७) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती आदेश क्र.सहसंलेवको/अम./आस्था-२/म.वि.ले.स. एकतर्फी कार्यमुक्त/१४४६/२०२५/२४२१, दि.०९.१२.२०२५

542

**-: <u>शासन आदेश</u> :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात क्षेत्रिय स्तरावर कार्यरत नियमित लेखा अधिकारी यांच्या सेवा दि.३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी संपुष्टात येत असल्याने संदर्भ क्र.२ अन्वये त्यांच्या अधिनस्त कार्यरत लेखा अधिकाऱ्यांना दि.३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील खालील तक्त्यात नमूद ०६ लेखा अधिकाऱ्यांना दि.३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी सबंधित उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यमुक्त केलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन प्र. दांडगे, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, अचलपूर, जि. अमरावती |
| २ | श्री. नरेंद्र ना. भटुरकर, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, अमरावती |
| ३ | श्री. राजेश ना. जगताप, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, जि. यवतमाळ |
| ४ | श्री. विशाल रे. पाराशर, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, मेहकर, जि. बुलढाणा |
| ५ | श्री. राजेश अ. भुयार, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, मोर्शी, जि. अमरावती |
| ६ | श्री. प्रविण म. चव्हाण, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, पुसद, जि. यवतमाळ |

२. वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असल्याने उपरोक्त तक्त्यातील ०६ लेखा अधिकारी हे दि.०१.०१.२०२५ (म.पू.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयात रुजू झाले असून सदर अधिकाऱ्यांची सेवा उपयोगात आणणे आवश्यक असल्याने त्यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात स्वीय प्रपंजी लेख्यांच्या पडताळणीबाबत कामकाज सोपविण्यात आले.

00946/2026/1319
5.06.2026

३.	वित्त विभागाचे दि.१५.०१.२०२५ रोजीचे शासन आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेल्या खालील तक्त्यात नमूद ०६ लेखा अधिकाऱ्यांना स्तंभ ३ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | नियमित पदस्थापना दिलेले कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. नितीन प्र. दांडगे | लेखा अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, अमरावती |
| २ | श्री. नरेंद्र ना. भट्टुरकर | लेखा अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला |
| ३ | श्री. राजेश ना. जगताप | लेखा अधिकारी (खर्च), जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला |
| ४ | श्री. विशाल रे. पाराशर | लेखा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती |
| ५ | श्री. राजेश अ. भुयार | लेखा अधिकारी (संगणीकरण), सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती |
| ६ | श्री. प्रविण म. चव्हाण | अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, यवतमाळ |

४.	त्यानुसार सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांचे दि.१६.०१.२०२५ रोजीचे आदेशान्वये वरीलप्रमाणे नियमित पदस्थापना दिलेल्या कार्यालयात रुजू होण्यासाठी वरील लेखा अधिकारी यांना दि.१६.०१.२०२५ (म.पू.) रोजी संबंधित कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

५.	उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदीनुसार परि.३ मध्ये नमूद लेखा अधिकारी संवर्गातील ०६ अधिकाऱ्यांचा खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रतिक्षाधीन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे :

| अ.क्र. | कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.०१.०१.२०२५ ते दि.१५.०१.२०२५ | १५ दिवस | नियमित करावयाचा कालावधी |
| | **एकुण** | **१५ दिवस** | |

६.	यास्तव, उपरोक्त परिच्छेद ३ मध्ये नमूद लेखा अधिकारी संवर्गातील ०६ अधिकाऱ्यांना दि.०१.०१.२०२५ ते दि.१५.०१.२०२५ पर्यंत १५ दिवसांच्या नियमित करण्यात आलेल्या प्रतिक्षाधीन कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६) संबंधित लेखा अधिकारी,*
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)